# प्रकरण – १५

# संस्थेने आपल्या कार्यपूर्तीसाठी आखून दिलेली प्रमाणके

महापालिका विश्लेषक प्रयोगशाळेने आपल्या कार्याची गुणवत्ता, अचुकता व कार्यक्षमतेची पूर्तता सुनिश्चित करण्यासाठी काही प्रमाणके निश्चित  केली आहेत. या प्रमाणकांच्या आधारे प्रयोगशाळेतील सर्व कामकाज पार पाडते.

1. नमुना स्वीकारण्याची प्रमाणित पध्दत

प्राप्त नमुने विहित शुल्क स्वीकारून ,योग्य नोंदणी करून निर्धारित निकषांनुसार स्वीकारले जातात.

2. तपासणीतील अचूकता व विश्वसनीयता

सर्व नमुन्यांची तपासणी वैज्ञानिक पध्दतीने व मान्यताप्राप्त निकषांनुसार केली जाते.

3. कालमर्यादेत अहवाल देणे

नमुन्यांच्या तपासणीनंतर निर्धारित वेळेत अहवाल तयार करून संबंधित विभागास / व्यक्तीस अहवाल सुपूर्द केला जातो.

4. उपकरणांची नियमित तपासणी व देखभाल

प्रयोगशाळेतील सर्व यंत्रसामग्री कार्यक्षम राहावी यासाठी त्यांची नियमित तपासणी व देखभाल केली जाते.

5. नोंदी व अभिलेख व्यवस्थापन

नमुने, तपासणी निष्कर्ष, अहवाल व इतर कागदपत्रांची योग्य नोंद व जतन केले जाते.

6. कर्मचा-यांची कार्यक्षमता व प्रशिक्षण

कर्मचा-यांना आवश्यक तांत्रिक प्रशिक्षण देऊन कार्यकुशलता वाढविण्यात येते.

7. कायदे व शासन नियमांचे पालन

प्रयोगशाळेचे सर्व कामकाज संबंधित कायदे, नियम व महापालिका व शासन निर्देशांनुसार केले जाते.